# प्रेसनोट_ दि.२६/०८/२०१९
# दत्तवाडी पोलीस स्टेशन.पुणे

## “जनता वसाहत येथे अनैतीक संबधातुन एकाचा खुन करुन फरार झालेल्या नराधमास दत्तवाडी पोलीसांनी २४ तासांचे आत केले जेरबंद”

दि. २५/०८/२०१९ रोजी जनता वसाहत गल्ली नं. ९१, येथे दुपारी ०१/३० वा. चे सुमारास इसम नामे गणपत मारुती झगडे,रा. गल्ली नं. ९१, जनता वसाहत, पुणे याने त्याचे अनैतीक संबध असलेली महीला हिची व त्याची अशी दोघांची तक्रार देण्यासाठी पोलीस चौकीला चाललेले इसम नागेश राजाराम कदम व त्याची पत्नी सारिका रा. सदर यांना अडवुन नागेश कदम यास लोखंडी पाईपने डोक्यात सपासप वार करुन जागीच ठार करुन त्याचे पत्नीसही रॉडने मारहाण करुन फरार झाला होता. त्याबाबत सारिका राजाराम कदम यांनी तक्रार दिलेवरुन दत्तवाडी पोलीस ठाणेस गुन्हा रजि. नं. ३८८/२०१९ भा.द.वि.कलम ३०२, ३२४, ५०४, ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील आरोपी नामे गणपत मारुती झगडे रा. गल्ली नं. ९१, जनता वसाहत, पुणे हा निघृनपणे खुन करुन फरार झाला होता त्याचा तपास करण्यासाठी दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली तीन टीम तयार करण्यात आल्या होत्या व कालपासुन आरोपीचे नातेवाईकांकडे, एस टी स्टॅंडवर व आरोपीचे घराजवळ टेकडीवर जंगलात तीन पथकांमार्फत कसुन तपास चालु होता.

त्यानंतर आज दि. २६/०८/२०१९ रोजी तपासपथकातील पो. हवा. रविंद्र फुलपगारे व पो. शि. अक्षयकुमार वाबळे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, “ जनता वसाहत येथील मयत इसम नामे नागेश राजाराम कदम याचा खुन करणारा गणपत मारुती झगडे हा जनता वसाहत वाघजाई मंदीर जवळील जंगलात आला आहे.” अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने मिळालेली बातमी त्यांनी वरिष्ठांना कळवुन मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री देविदास घेवारे सो व पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक कुलदीप संकपाळ, पोलीस कर्मचारी पो हवा. राजु जाधव, पो. हवा. रविंद्र फुलपगारे, पो. हवा. तानाजी निकम, पो. ना. सुधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पो. ना. सोमेश्वर यादव, पो. ना. बजरंग पवार, पो. शि. सागर सुतकर, पो. शि. विकास कदम, पो. शि. शरद राऊत, पो. शि. अक्षयकुमार वाबळे, पो. शि. शिवाजी क्षिरसागर, पो. शि. राहुल ओलेकर, पो. शि. नवनाथ भोसले, पो. शि. अमोल लोहार व पो. शि. अभिजित कळसकर यांनी तीन टिम करुन जनता वसाहत, पर्वती टेकडी, वाघजाई मंदीराजवळील जंगलामध्ये तीनही बाजुंनी तीन टिम मिळुन सापळा रचुन शोध घेतला असता नमुद आरोपी नामे गणपत मारुती झगडे हा वाघजाई मंदीराजवळील जंगलात दाट झाडीत लपलेला असलेला दिसल्याने त्यास अत्यंत शिताफीने वरील स्टाफने आज दि. २६/०७/२०१९ रोजी १६/०० वा. जागीच पकडले. तेव्हा त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव गणपत मारुती झगडे रा. गल्ली नं. ९१, जनता वसाहत, पुणे असे असल्याचे सांगितले त्यावेळी त्याचेकडे नागेश राजाराम कदम याचे खुनाबाबत तपास केला असता त्याने सांगीतले की, “आमचे येथे राहणारी महीला हिच्याशी माझे अनैतीक संबध आहेत यावरुन मला व तीला नागेश कदम व त्याचे घरातील लोक टोमणे मारत असत म्हणुन मी त्यांना शिविगाळ करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती म्हणुन ते त्याबाबत माझी व तीची तक्रार देणेकामी पोलीस चौकीला निघाले असल्याने मला त्यांचा राग आला व मी त्यांना मध्येच अडवुन माझेकडे असणारे लोखंडी पाईपने नागेश कदम याचे डोक्यात सपासप वार करुन त्यास जागीच ठार मारुन त्याचा खुन केला आहे.” असे सांगीतले आहे म्हणुन त्याला पोलीस ठाणेस आणुन त्याला व आरोपी महिला हिस दाखल गुन्हयात आजरोजी अटक केले असुन त्यांना मा. न्यायालयात हजर करणार आहेत. तसेच दाखल गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे हे स्वतः करीत आहेत.

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पो. स्टे. पुणे शहर